**ठळक बातम्या**

- राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याची मुदत संपुष्टात, उद्या छाननी

- आरक्षणाची ५० टक्के कमाल मर्यादा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओलांडता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- बिहारमधे नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी येत्या गुरुवारी पाटण्यात

- सौदी अरेबियात बस दुर्घटनेत ४५ जणांचा मृत्यू, तेलंगणा सरकारकडून ५ लाखांची मदत जाहीर

**आणि**

- बांगलादेशाच्या माजी प्रधानमंत्री शेख हसिना यांना फाशीची शिक्षा, मायदेशात जायला हसिना यांचा नकार

**<><><><><>**

राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याची मुदत आज संपुष्टात आली. उद्या, मंगळवारी अर्जांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर १९ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेता येतील. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

एकंदर आरक्षणावर असलेली ५० टक्क्यांची कमाल मर्यादा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये पाळावीच लागेल, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं आज दिला. बांठिया आयोगाच्या निष्कर्षांच्या आधारे या निवडणुकीत ओबीसी आरक्षण लागू करायच्या सरकारच्या निर्णयासंबंधीच्या

याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***व्हाइस कास्ट***

*(निवडणुकीची प्रक्रिया थांबवण्याचा न्यायालयाचा उद्देश नाही, मात्र आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जाता कामा नये, असं न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी आजच्या सुनावणीत स्पष्ट केलं. या निवडणुकांमध्ये इतर मागासवर्गीय प्रवर्गाला आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशांचा चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे, असं मत पीठानं नोंदवलं. महाधिवक्ता तुषार मेहता यांनी वेळ वाढवून द्यायची विनंती केली, मात्र तोपर्यंत निवडणूक अर्ज दाखल करायची प्रक्रिया संपलेली असेल, याकडे न्यायमूर्ती कांत यांनी लक्ष वेधलं. त्यावर, या काळात जे काही होईल, ते न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहील, अशी हमी मेहता यांनी दिली. या प्रकरणाची पुढची सुनावणी बुधवारी रोजी होणार आहे.)*

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसी करण्यासाठी राज्य सरकारनं ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचे e-kyc करावे आणि पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाच्या आदेशाची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातल्या महिला आणि बाल विकास अधिकाऱ्यांकडे जमा करावी, असं आवाहन महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे.

**<><><><><>**

बिहारमधे नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी येत्या गुरुवारी पाटण्यात गांधी मैदानावर होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह NDA चे अनेक वरीष्ठ नेतेही या समारंभाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

NDA, अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधिमंडळ पक्ष नेत्याची निवड लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. NDA तल्या दोन प्रमुख पक्षांपैकी संयुक्त जनता दलाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक आज होणार होती. मात्र ती पुढं ढकलली असून येत्या बुधवारी होण्याची शक्यता आहे. NDA च्या सर्व

घटक पक्षांच्या निवडून आलेल्या उमेदवारांची बैठक उद्या नियोजित आहे. मात्र जदयुची बैठक पुढं ढकलली गेल्यानं ही संयुक्त बैठकही पुढं ढकलली जाऊ शकते.

भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक उद्या होणार आहे. त्यात विधिमंडळ पक्षनेत्याची निवड केली जाईल.

राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांच्या अध्यक्षतेखाली आज पक्षाची बैठक झाली. त्यात निवडून आलेल्या उमेदवारांबरोबरच पराभूत उमेदवारही उपस्थित होते. यावेळी पक्षाच्या पराभवाच्या कारणांचा आढावा घेण्यात आला.

**<><><><><>**

दिल्ली स्फोटप्रकरणी कटात सहभागी असलेल्या आणखी एका दहशतवाद्याला राष्ट्रीय तपास संस्थेने जम्मू-काश्मीरमधून अटक केली आहे. जसीर बिलाल वानी उर्फ दानिश असं या दहशतवाद्याचं नाव असून त्याने हा स्फोट घडवून आणण्यासाठी तांत्रिक मदत पुरवली होती. मूळचा अनंतनाग जिल्ह्यातल्या काझीगुंड इथला रहिवासी असलेला जसीर हा उमर उन नबी याचा सहकारी आहे. दरम्यान, दिल्ली स्फोटात जखमी झालेल्या अन्य दोघांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला असून आता मृतांची संख्या १५वर पोहोचली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात सोनभद्र जिल्ह्यात झालेल्या खाण दुर्घटनेतून एकूण पाच मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. गेल्या शनिवारी ही दुर्घटना घडली होती. बचाव आणि मदत कार्य अद्याप सुरू आहे. खाणीकडे जाणारे सर्व रस्ते बंद करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

सौदी अरेबियात बस आणि डिझेल टँकर यांच्यात धडक होऊन झालेल्या दुर्घटनेत ४५ जणांचा मृत्यू झाला असून केवळ १ जण बचावला आहे. मृतांमध्ये १७ पुरुष, १८ महिला आणि १० बालकं आहे. यात मरण पावलेल्या प्रत्येक

मृताच्या कुटुंबियाला ५ लाख रुपये मदत म्हणून देणार असल्याचं तेलंगणा सरकारनं जाहीर केलं आहे. तेलंगणा सरकारचं एक प्रतिनिधी मंडळ सौदी अरेबियाला पाठवण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे.

**<><><><><>**

बांगलादेशाच्या आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायाधीकरणाने माजी प्रधानमंत्री शेख हसिना यांना आज फाशीची शिक्षा सुनावली. गेल्यावर्षी जुलै महिन्यात झालेल्या हिंसाचाराबद्दल त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

## व्हाइस कास्ट

*(ऑगस्ट २०२४ मधे विद्यार्थी आंदोलकांना मारण्याच्या उद्देशाने बळाचा वापर करण्याचे आदेश हसिना यांनी दिले, असं न्यायाधीकरणाने म्हटलं आहे. गुन्हेगारी कट रचणं, चिथावणी देणं यासह अनेक गुन्ह्यांसाठी हसिना यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. शेख हसीना यांच्यासह माजी केंद्रीय गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांनाही फाशीची शिक्षा देण्यात आली आहे. माजी पोलीस महानिरीक्षक चौधरी अब्दुल्ला अल मामुन हे माफीचे साक्षीदार झाल्याने त्यांना पाच वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. निकालाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशात कडक पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. तसंच सैन्याच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.*

***शेख हसिना** यांनी बांगलादेशात परतायला नकार दिला असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. हा निकाल लोकशाही प्रक्रियेद्वारे निवडून न आलेल्या सरकारने दिलेला असून राजकीय हेतूने प्रेरित आहे, अशी टीका हसिना यांनी केली आहे.*

***दरम्यान,** बांगलादेश सरकारने भारताकडे शेख हसिना आणि असदुज्जमान खान कमाल या दोघांचा ताबा मागितला आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या प्रत्यार्पणाच्या करारानुसार फरार आरोपींचं हस्तांतर करणं भारताला बंधनकारक असून असं न करणं हे न्यायाचा अवमान ठरेल असं बांगलादेशाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे.*

*या निकालाची नोंद घेतल्याचं भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे. शेजारी राष्ट्र म्हणून भारत नेहमीच बांगलादेशातल्या नागरिकांचा हिंतचिंतक आहे, बांगलादेशात शांतता, स्थैर्य नांदावं अशी भारताची इच्छा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

डेमोक्रेटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये तांबे आणि कोबाल्ट खाणीतला पूल कोसळून ३२ जणांचा मृत्यू झाला. आग्नेय लुआलाबा प्रांतात परवा ही दुर्घटना घडली.

**<><><><><>**

छापील माध्यमात सरकारी जाहीराती छापण्यासाठीचे दर केंद्र सरकारने २६ टक्क्यांनी वाढवले आहेत. त्यानुसार आता दैनिकाच्या एक लाख प्रतींमधे सरकारी जाहीरात छापताना प्रतिचौरस सेंटीमीटर ५९ रुपये ६८ पैसे आकार बसेल. या आधी हा दर प्रतिचौरस सेंटीमीटर ४७ रुपये ४० पैसे इतका होता.

**<><><><><>**

गुंतवणूकदारांच्या हितरक्षणासाठी केंद्रसरकार आणि विविध नियामक यंत्रणांनी प्रभावी उपाययोजना केल्या असल्याचं केंद्रीय अर्थमंत्रालयाच्या सचिव अनुराधा ठाकूर यांनी सांगितलं. CII तर्फे मुंबईत आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात त्या बोलत होत्या.

अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी प्रारंभिक समभाग विक्रीचा आधार घेतला जात असल्याबद्दल मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंतनागेश्वरन यांनी चिंता व्यक्त केली. गुंतवणुकीच्या आकड्यांना प्रत्यक्ष कामगिरीचं पाठबळ मिळालं नाही तर वैयक्तिक बचत उत्पादक गुंतवणुकीपासून फारकत घेऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.

भारतीय शेअर बाजारात परदेशी गुंतवणुकीपेक्षा देशांतर्गत संस्था आणि वैयक्तिक गुंतवणूकदारांचा वाटा जास्त असल्याची माहिती सेबीचे अध्यक्ष तुहीनकांत पांडे यांनी दिली. येत्या ३ ते ५ वर्षात ही गुंतवणूक दुप्पट होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या तिरंदाजांनी केलेल्या कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून त्यांचं कौतुक केलं आहे. या तिरंदाजांनी ६ सुवर्णांसह १० पदकं जिंकली आहेत. १८ वर्षांनंतर पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात मिळालेलं सुवर्णपदक ऐतिहासिक असून वैयक्तिक आणि सांघिक प्रकारात तिरंदाजांनी दमदार कामगिरी केली आहे.

**<><><><><>**

युनेस्को आणि यूएन इन इंडिया यांनी आयोजित केलेल्या ग्लोबल ॲबिलिटी फोटोग्राफी चॅलेंजमध्ये सिद्धार्थ गायकवाड यानं सर्वोत्कृष्ट फोटोचा किताब पटकावला आहे. त्याच्यासह वरुण नरेन, मानवी बत्रा, बेकी बेली आणि डिलन लॉम्बार्ड यांनाही या स्पर्धेचे विजेते म्हणून घोषित करण्यात आलं. नवी दिल्ली इथं झालेल्या झीरो प्रोजेक्ट ऑर्ग आणि सीआयआय आयबीडीएन राष्ट्रीय परिषदेत त्यांना पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी आज नॉर्वेचे आरोग्यमंत्री यान क्रिस्टियन वेस्त्र यांच्याशी नवी दिल्ली इथं चर्चा केली. आरोग्य आणि उपचार  तसंच औषध नियंत्रण क्षेत्रात उभय देशांमधल्या सहकार्याला चालना देण्याच्या दृष्टीनं समझोता करार करण्याचा प्रस्ताव या चर्चेदरम्यान मांडल्याचं नड्डा यांनी सांगितलं.  डिजिटल आरोग्य सुविधा, माता आणि बालकांचं पोषण,तसंच विविध रोगविषयक संशोधनाविषयी देखील त्यांनी चर्चा केली.

**//<><><><><>//**